संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नीत

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित

# जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर.

# राष्ट्रीय सेवा योजना

पथकाद्वारा आयोजित

***विशेष श्रमसंस्कार शिबिर***

दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५

स्थळ :- जि. प. शाळा तोंगलाबाद

# अहवाल



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व्दारा संचालित श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तकग्राम तोंगलाबाद ता.दर्यापूर येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजीत करण्यात आले होते. या आठ दिवसीय शिबिरात अंतर्गत

खालील प्रकल्प राबववण्यात आले

१) स्वच्छ भारत अभियान २) वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन ३) हागणदारी मुक्त गाव करण्यासाठी उद्बोधन ४ ) प्लास्टिक निर्मूलन ५ ) पर्यावरण जनजागृती ६ ) व्यक्तीमत्व विकास ७ ) रोगनिदान शिबिर ८ ) अंधश्रद्धा निर्मूलन ९ ) कृषी विषयक मार्गदर्शन १०) उज्वला योजना जनजागृती योजना ११) प्रधानमंत्री जनधन योजना जनजागृती १२) प्रधानमंत्री आवास योजना जनजागृती योजना १३) प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना जनजागृती योजना १४) शिव्या मुक्त भारत योजना १५) पानी अडवा पानी जिरवा योजना

वरील प्रकल्पाचे उद्दिष्टे समोर ठेवून विशेष श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आलेल्या शिबिरामध्ये ५० मुले (स्वयंसेवक) व ५० मुली (स्वयंसेवीका ) सहभागी झाले होते हे शिबिर जिल्हा परिषद शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर येथे घेण्यात आले सकाळी प्रार्थना , योगासने, प्रभात फेरी, श्रमदान दुपारी बौद्धिक सत्र तर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम अशा तीन सत्रात विशेष श्रम संस्काराची विभागणी करण्यात आली .

## २१/०२/२०२५

दिनांक २१/०२/२०२५ ला राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे दत्तकग्राम तोंगलाबाद ता. दर्यापूर येथे आगमन व नोंदणी करून परिसर स्वछता करण्यात आली व स्वयंसेवकांची गटविभागणी करून गावकऱ्यांशी चर्चा करून प्रकल्पाची पाहणी करून शिबिराचे नियोजन करण्यात आले . तसेच प्रार्थना व स्फूर्ति गीते स्वयंसेवकानी सादर केली .

## २२ /०२/२०२५

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे आयोजित केलेले आहे.२२ फेब्रुवारी २०२५ ला मा. प्राचार्य श्री केशवराव रामकृष्ण गावंडे (सदस्य , कार्यकारी परिषद, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती ) यांच्या अध्यक्षतेत , मा. डॉ. निलेश कडू संचालक , राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या हस्ते झाले. डॉ. निलेश कडू यांनी आपल्या उद्घाटन पर मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विशेष श्रमसंस्कार शिबिर हे संस्कारमय देवाण घेवाण करण्याचे एक उत्तम मंच आहे, आरोग्य स्वच्छता पर्यावरण संरक्षण साक्षरता ग्राम विकास यासारख्या सामाजिक विषयांमध्ये

स्वयंसेवकांचे कार्य अतिशय उत्कृष्ट असते.तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्दिष्ट केवळ समाजसेवा करणे नाही, तर युवकांना जबाबदार नागरिक बनवणे आहे. "स्वतःसाठी नाही, तर समाजासाठी" या संकल्पनेनुसार राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे योगदान देतात. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.प्राचार्य श्री केशवरावजी गावंडे ,कार्यकारिणी सदस्य शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांना समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी काम करण्याची संधी देते जेणेकरून सुजान समाज घडविण्यास मदत होते व राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना समाजसेवेशी जोडणारी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रीय जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

डॉ. अतुल बोडखे प्राचार्य यांनी आपल्या स्वागतपर मनोगतातून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा चढता आलेख स्पष्ट केला तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कर्तव्य विशद केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहूल सावरकर यांनी केले

या प्रसंगी ग्रामपंचायत तोंगलाबाद व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने केलेल्या वृक्ष रोपनाकरीता पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून प्रा. राहुल सावरकर कार्यक्रम अधिकारी व डॉ. सुशील चरपे सहा. कार्यक्रम अधिकारी यांनी स्व. खर्चातून २२ हजार रुपये किमतीचे २० स्प्रिंकलर (sprinkler) पाईप भेट स्वरूपात देण्यात आले.

या आठ दिवसीय विशेष श्रमसंस्कार संस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमास गावातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद कार्यक्रम अधिकारी श्री राहुल

सावरकर प्रा. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशील चरपे सह कार्यक्रम अधिकारी डॉ प्रीती दिवाण महीला सह कार्यक्रम अधिकारी कू.श्रेया गायगोले हिने कार्यक्रमाचे संचालन केले तर केले . आभार प्रदर्शन कू अनुराधा गावंडे हिने केले.








आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

आता रोज रहा अपडेट!

# अध्ययन समाचार

संपादक : जितेंद्र रोडे

सुविचार
मेहनती शिवाय कोणतेही स्वप्न पूर्ण होत नाही.

कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805 | भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005 | jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar

शनिवार दि. २२ फेब्रुवारी २०२५

## सांगळूदकर महाविद्यालयातील श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन संपन्न

### सुजान समाज घडवण्याचे कामात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्वाचे योगदान -केशवराव गावंडे

अध्ययन समाचार वृत्त
दर्यापूर दि. २२ । गौरव टोळे

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे आयोजित केलेले आहे.२२ फेब्रुवारी २०२५ ला प्राचार्य केशवराव रामकृष्ण गावंडे (सदस्य, कार्यकारी परिषद, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) यांच्या अध्यक्षतेत, डॉ. निलेश कडू संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या हस्ते झाले. डॉ. निलेश कडू यांनी आपल्या उद्‌घाटन पर मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विशेष श्रमसंस्कार शिबिर हे संस्कारमय देवाण घेवाण करण्याचे एक उत्तम मंच आहे, आरोग्य स्वच्छता पर्यावरण संरक्षण साक्षरता ग्राम विकास यासारख्या सामाजिक विषयांमध्ये स्वयंसेवकांचे कार्य अतिशय उत्कृष्ट असते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशवरावजी गावंडे, कार्यकारिणी सदस्य शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांना समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी काम करण्याची संधी देते जेणेकरून सुजान समाज घडविण्यास मदत होते असे सांगितले.

डॉ. अतुल बोडखे प्राचार्य यांनी आपल्या स्वागतपर मनोगतातून महाविद्यालयातील रा.से.यो.चा चढता आलेख स्पष्ट केला तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कर्तव्य विशद कले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहूल सावरकर यांनी केले.

या आठ दिवसीय विशेष श्रमसंस्कार संस्कार शिबिराच्या उद्‌घाटन कार्यक्रमास गावातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद कार्यक्रम अधिकारी राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशील चरपे सह कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रीती दिवाण महीला सह कार्यक्रम अधिकारी डॉ. रणजित गणोदे आदी उपस्थित होते. श्रेया गायगोले हिने कार्यक्रमाचे संचालन केले तर केले. आभार प्रदर्शन अनुराधा गावंडे हिने केले.



देशोन्नती

# सुजाण समाज घडवण्याच्या कामात रा. से. यो.चे महत्त्वाचे योगदान

- प्राचार्य केशवराव गावंडो यांचे प्रतिपादन
- सांगळूदकर महाविद्यालयात श्रमसंस्काराच्या शिबिराचे उद्‌घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन

**दर्यापूर :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर २१ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हापरिषद प्राथमिक शाळा, तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे आयोजित केलेले आहे.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन२२ फेब्रुवारी २०२५ ला प्राचार्य केशवराव रामकृष्ण गावंडे (सदस्य, कार्यकारी परिषद, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) यांच्या अध्यक्षतेत, डॉ. निलेश कडू संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्याहस्ते झाले. डॉ. निलेश कडू यांनी आपल्या उद्‌घाटनपर मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विशेष श्रमसंस्कार शिबिर हे संस्कारमय देवाण घेवाण करण्याचा एक उत्तम मंच आहे. आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण, संरक्षण, साक्षरता, ग्रामविकास यासारख्या सामाजिक विषयांमध्ये स्वयंसेवकांचे कार्य अतिशय उत्कृष्ट असते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशवराव गावंडे, कार्यकारिणी सदस्य शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी राष्ट्रीय सेवा योजना हे विद्यार्थ्यांना समाजातील गरजू आणि वंचित घटकांसाठी काम करण्याची संधी देते. जेणेकरून सुजाण समाज घडविण्यास मदत होते.

डॉ. अतुल बोडखे प्राचार्य यांनी आपल्या स्वागतपर मनोगतातून महाविद्यालयातील रा.से.यो.चा चढता आलेख स्पष्ट केला, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कर्तव्य विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहूल सावरकर यांनी केले.

या आठ दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‌घाटन कार्यक्रमास गावातील नागरिक, महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद कार्यक्रम अधिकारी राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार, महीला कार्यक्रम अधिकारी डॉ. सुशील चरपेसह कार्यक्रम अधिकारी डॉ.प्रीती दिवाण,डॉ. रणजित गणोदे उपस्थित होते. कु.श्रेया गायगोले हिने कार्यक्रमाचे संचालन केले. आभार प्रदर्शन कु.अनुराधा गावंडे हिने केले.

प्लॉट विकणे आहे

Amravati Edition
Feb 23, 2025 Page No. 2

संध्याकाळ च्या सांस्कृतिक कार्यक्रमात भजन संध्या कार्यक्रम गावकऱ्यांसाठी व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता या भजन संध्यात महाविद्यालायची माजी विद्यार्थिनी ह. भ. प. ज्ञानेश्वरी महाराज धर्माळे यांनी त्यांच्या उपस्थिताना कीर्तनातून मंत्रमुग्ध केले .



**२3 /०२/२०२५**

सकाळ च्या सत्रात योगासने व व्यायाम नंतर प्रभातफेरी काढण्यात आली व त्यानंतर २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या सत्रात एकूण लागवड केलेल्या ८५०० वृक्षाच्या जागी जाऊन वृक्षसंवर्धन प्रकल्पच्या दृष्टीने स्वयंसेवकाकडून श्रमदान करण्यात आले








दुपार च्या बौद्धिक सत्रात :-

गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला या जग कल्याणाचा मंत्र जपत कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी सर्व मानव जातींचा काला करून एक मानवता जातीची तथा धर्माची निर्मिती केली असे अभ्यासपूर्ण प्रतिपादन दर्यापूरच्या संत गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी गाडगे बाबा जयंती च्या अनुषंगाने बौद्धिक सत्रात केले. दर्यापूर येथील जे डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या दत्तक ग्राम तोंगलाबाद येथे सुरु असलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या दैनंदिन बौद्धिक सत्रात प्रा. गजानन भारसाकळे प्रमुख वक्ते तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद मा.ब. उपाख्य अण्णासाहेब रेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते आपल्या ओजस्वी वाणीने व प्रखर प्रबोधनीय विचारांनी प्रा.गजानन भारसाकळे यांनी या प्रसंगी उपस्थित समोर संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील जवळपास सर्वच मार्मिक प्रसंग विद्यार्थी व स्वयंसेवकाना विषद केलेत तथा त्यातील बोध शिबिरार्थी स्वयंसेवक व घेण्याच्या विचारांवर विस्तृत भाष्यही केले मानवता धर्माची , महिला जपवणूक करण्यासाठी गाडगेबाबांनी दिलेला दशसूत्री संदेश महत्वाचा  असल्याचे व्यक्तव्य करून गाडगेबाबाच्या दशसूत्री कार्यक्रम महत्वाचा आहे कार्यक्रम अधिकारी. प्रा. राहूल सावरकर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वैशाली चोरपगार  डॉ सुशिल चरपे व प्रा डॉ प्रिती दिवाण महाविद्यालयातील प्राध्यापक  डॉ. संजय आगलावे, डॉ नंदकिशोर गोपकर , डॉ रवि गावंडे , कू .  राखी भागवत यांची प्रामुख्याने उपस्थिती  होती  सूत्रसंचलन ओम ओलोकार, प्रास्ताविक कु कल्याणी खवले आभार प्रदर्शन कु हर्षाली सगणे यांनी केले.







आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
आता रोज रहा अपडेट!
अध्ययन समाचार
संपादक : जितेंद्र रोडे
रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२५

## संत गाडगेबाबा यांची दशसूत्रांचा प्रत्येक विद्यार्थ्याने जीवनात अवलंब करावा- प्रा.गजाननराव भारसाकळे

**अध्ययन समाचार वृत्तसेवा**

**दर्यापूर दि.२३ प्रतिनिधी**

**जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर २१ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल के बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेले आहे. २३ फेब्रुवारी २०२५ ला आयोजित बौद्धिक सत्राच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.ब. उपाख्य अण्णासाहेब रेचे, आजीवन सभासद, शिवाजी शिक्षण संस्था अमरावती म्हणून उपस्थित होते तसेच या बौद्धिक सत्राकरिता प्रमुख वक्ते म्हणून गजाननराव भारसाकळे, अध्यक्ष गाडगेबाबा मंडळ दर्यापूर यांनी 'गाडगे बाबांचा दशसूत्री संदेश' यावर विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच या सूत्रांचा उपयोगी उपक्रमामध्ये सहभाग घ्यावा. सदर कार्यक्रमाकरिता सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय आगलावे, डॉ. नंदकिशोर गोपकर, डॉ.रवी गावंडे तसेच प्राध्यापिका राखी भागवत प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओम ओलोकार या विद्यार्थ्याने तसेच प्रास्ताविक कु. कल्याणी खवले व आभार प्रदर्शन कु. हर्षाली सगणे, या विद्यार्थ्यांनी उत्तमरीत्या पार पाडले.



## सांगळूदकर महाविद्यालयाचे रा.से.यो. शिबिरातील बौद्धिक सत्र

### गाडगेबाबांनी सर्व जातींचा काला करून मानवता धर्म निर्माण केला : प्रा गजानन भारसाकळे

दर्यापूर दि. २५ : गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला या जग कल्याणाचा मंत्र जपत कर्मयोगी संत गाडगेबाबा यांनी सर्व मानव जातींचा काला करून एक मानवता जातीची तथा धर्माची निर्मिती केली असे अभ्यासपूर्ण प्रतिपादन दर्यापूरच्या संत गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक - अध्यक्ष प्रा गजानन भारसाकळे यांनी केले . दर्यापूर येथील जे .डी . पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या दत्तक ग्राम तोंगलाबाद येथे सुरु असलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या दैनंदिन बौद्धिक सत्रात प्रा. गजानन भारसाकळे प्रमुख वक्ते तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद मा .ब . उपाख्य अण्णासाहेब रेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते .आपल्या ओजस्वी वाणीने व प्रखर प्रबोधनीय विचारांनी प्रा. भारसाकळे यांनी या प्रसंगी उपस्थित विद्यार्थी तथा कार्यक्रम प्रभारी प्राध्यपकांच्या समोर संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील जवळपास सर्वच मार्मिक प्रसंग सादर करून त्यातील बोध घेण्याच्या विचारांवर विस्तृत भाष्यही केले . मानवता धर्माची जपवणूक करण्यासाठी गाडगेबाबांनी दिलेला दशसूत्री संदेश महत्वाचा असल्याचे व्यक्तव्य करून गाडगेबाबाच्या जीवन निर्वाणाचा प्रसंग विषद करतांना त्यांनी सर्व श्रोतृ वर्गाचे लक्ष वेधून घेतले त्यावेळी समागृहात पूर्ण शांतता पसरली होती .अण्णासाहेब रेचे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून

विद्यार्थांना यथोचित मार्गदर्शन केले .संत गाडगेबाबा यांच्या जयंती दिनी संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी सर्व शिबिरार्थी , स्वयंसेवक व स्वयंसेविका , कार्यक्रम अधिकारी प्रा. राहूल सावरकर , महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.वैशाली चोरपगार तथा सहकार्यक्रम अधिकारी प्रा डॉ सुशिल चरपे व प्रा डॉ प्रिती दिवाण तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ संजय आगलावे , डॉ नंदकिशोर गोपकर, डॉ रवि गावंडे व प्रा. राखी भागवत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती .कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ओम ओलोकार , प्रास्ताविक कु कल्याणी खवले तथा आभार प्रदर्शन कु हर्षाली सगणे यांनी केले .

## माजी विद्यार्थ्यांनी दिला जुन्या आठवणींना उजाळा

**देशोन्नती**

# गाडगेबाबांनी सर्व जातींचा काला करुन मानवताधर्म निर्माण केला - प्रा. गजानन भारसाकळे

## सांगळूदकर महाविद्यालयाचे रासेयो शिबिरातील बौद्धिक सत्र



शोन्नती वृत्तसंकलन

**दर्यापूर** : 'गोपाला गोपाला वकी नंदन गोपाला' या जग कल्याणाचा मंत्र जपत कर्मयोगी ंत गाडगेबाबा यांनी सर्व ानवजातींचा काला करून एक ानवता जातीची तथा धर्माची ेर्मिती केली, असे अभ्यासपूर्ण तिपादन दर्यापूरच्या संत ाडगेबाबा मंडळाचे संस्थापक ध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे ांनी केले.

दर्यापूर येथील जे. डी. पाटील ांगळूदकर महाविद्यालयाच्या त्तकग्राम तोंगलाबाद येथे सुरु सलेल्या संत गाडगेबाबा मरावती विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय ेवा योजना उपक्रमाच्या दैनंदिन ौद्धिक सत्रात प्रा. गजानन ारसाकळे प्रमुख वक्ते तथा श्री ेवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन भासद मा.ब. उपाख्य ण्णासाहेब रेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

आपल्या ओजस्वी वाणीने व प्रखर प्रबोधनीय विचारांनी प्रा. भारसाकळे यांनी याप्रसंगी उपस्थित विद्यार्थी तथा कार्यक्रम प्रभारी प्राध्यपकांच्या समोर संत गाडगेबाबा यांच्या जीवनातील जवळपास सर्वच मार्मिक प्रसंग सादर करून त्यातील बोध घेण्याच्या विचारांवर विस्तृत भाष्यही केले. मानवता धर्माची जपवणूक करण्यासाठी गाडगे बाबांनी दिलेला दशसूत्री संदेश महत्त्वाचा असल्याचे व्यक्तव्य करून गाडगेबाबांच्या जीवन निर्वाणाचा प्रसंग विशद करताना त्यांनी सर्व श्रोतृवर्गाचे लक्ष वेधून घेतले.

तसेच अण्णासाहेब रेचे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थांना यथोचित मार्गदर्शन केले. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीदिनी झालेल्या या कार्यक्रमासाठी सर्व शिबिरार्थी, स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. वैशाली चोरपगार तथा सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुशिल चरपे व प्रा. डॉ. प्रीती दिवाण तसेच महाविद्यालयातील प्रा. डॉ. संजय आगलावे, डॉ. नंदकिशोर गोपकर, डॉ. रवी गावंडे व प्रा. राखी भागवत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओम ओलोकार, प्रास्ताविक कु. कल्याणी खवले तथा आभार हर्षाली सगणे यांनी मानले.

Amravati Edition
Feb 26, 2025 Page No. 7

# संत गाडगे बाबा ने मानव धर्म का निर्माण किया

**प्रा. गजानन भारसाकले का प्रतिपादन**



**प्रतिनिधि/दि.२६**

**दर्यापुर** - संत गाडगे बाबा महाराज ने गोपाला-गोपाला देवकी नंदन गोपाला का मंत्र जपते हुए सभी जातियों को एकता के सूत्र में बांधकर मानव धर्म का निर्माण किया है, ऐसा प्रतिपादन स्थानीय संत गाडगे बाबा मंडल संस्थापक अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकले वे स्थानीय जे. डी. पाटिल सांगुदकर महाविद्यालय के दत्तक ग्राम तोंगलाबाद में शुरू संत गाडगे बाबा विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना शिविर के दैनिक बौद्धिक सत्र में बोल रहे थे. कार्यक्रम की अध्यक्षता श्री शिवाजी शिक्षण संस्था आजीवन सदस्य अन्नासाहब रेचे ने की. अन्नासाहब रेचे ने अपने भाषण में संत गाडगे बाबा द्वारा दिये गये दससूत्री के संदेश का महत्व विशद किया और विद्यार्थियों का मार्गदर्शन किया. कार्यक्रम में रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. वैषाली चोरपगार, सह कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुशिल चरपे, डॉ. प्रीति दिवान, महाविद्यालय के प्राध्यापक डॉ. संजय आगलावे, डॉ. नंदकिशोर गोपकर, डॉ. रवि गावंडे, प्रा. राखी भागवत उपस्थित थी. कार्यक्रम का संचालन ओम ओलोकार ने किया व प्रास्थाविक कल्याणी खवले ने रखा तथा आभार हर्षाली सगने ने माना.

संध्याकाळ च्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमात श्री विदयाराज कोरे, समाजसेवक मोर्शी यांनी मनोरंजनातून समाजप्रबोधन केले त्यांनी संत गाडगे बाबा ची वेशभूषा परिधान करीत सर्वांचे लक्ष वेधले व उपस्थित जनसमुदायाला प्रबोधन करताना गाडगेबाबा त्यांच्यासमोर उभे केलेत .








पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर.

**२४/०२/२०२५**

सकाळ च्या सत्रात योगासने व व्यायाम नंतर प्रभातफेरी काढण्यात आली व त्यानंतर २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या सत्रात एकूण लागवड केलेल्या ८५०० वृक्षाच्या जागी जाऊन वृक्षसंवर्धन प्रकल्पच्या दृष्टीने स्वयंसेवकाकडून श्रमदान करण्यात आले



**दुपार च्या बौद्धिक सत्रात :-**

"सर्व धर्म सेवा भाव" ही संकल्पना मानवतेचा, एकात्मतेचा आणि परोपकाराचा संदेश देते. या प्रार्थनेचा मुख्य उद्देश म्हणजे सर्व धर्म, जात, पंथ यांच्यात ऐक्य राहावे आणि समाजात प्रेम, शांती व बंधुत्व वाढावे. ही प्रार्थना विविध धर्मांना जोडते आणि सर्वांमध्ये समानता आणि बंधुत्वाचा भाव निर्माण करते. प्रत्येक धर्म सेवा आणि प्रेम शिकवतो, आणि ही प्रार्थना त्याचेच प्रतीक आहे. ही प्रार्थना माणसाला निःस्वार्थ सेवेची प्रेरणा देते. गरजू लोकांना मदत करणे, समाजासाठी कार्य करणे आणि मानवतेच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेणे हा या प्रार्थनेचा गाभा आहे. सर्व धर्म शांती आणि अहिंसा यांना महत्त्व देतात. ही प्रार्थना तणाव, भेदभाव आणि संघर्ष यांना दूर ठेवून शांततेच्या मार्गावर जाण्यास प्रेरित करते. ही प्रार्थना व्यक्तीच्या मनात सकारात्मक ऊर्जा आणि आध्यात्मिक शांती निर्माण करते. दुसऱ्यांच्या सेवेने समाधान आणि आत्मिक आनंद मिळतो, जो जीवन अधिक अर्थपूर्ण करतो. ही प्रार्थना समाजात एकतेचा संदेश पसरवते. धर्म कोणताही असो, सेवा आणि परोपकार हाच खरा धर्म आहे, असा संदेश ही प्रार्थना देते. *सर्व धर्म सेवा भाव"* ही प्रार्थना माणुसकी, प्रेम आणि परोपकार यांचा सुगंध समाजात पसरवते. ही फक्त एक प्रार्थना नसून, समाज सुधारण्यासाठी आणि सर्वधर्म समभाव जपण्यासाठी आवश्यक एक विचारधारा आहे. २४ फेब्रुवारी २०२५ ला आयोजित बौद्धिक सत्राच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव देशमुख आजीवन सभासद, शिवाजी शिक्षण संस्था अमरावती म्हणून उपस्थित होते तसेच या बौद्धिक सत्राकरिता प्रमुख वक्ते म्हणून मा. डॉ सुरेंद्र शेजे मा. डॉ राजेश उमाळे, संगीत विभाग जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय,

दर्यापूर. यांनी विद्यार्थ्यांना सारे सारे गाऊ या राष्ट्रीय एकात्मता व अखंडता जोपासली जावी या हेतूने संगीत विभागाद्वारे राष्ट्रीय विद्यालय मधील एकूण ५० विद्यार्थी कार्यशाळेत सहभागी झाले होते डॉ राजेश उमाळे यांनी दोन गीतांचे प्रशिक्षण यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना दिले. प्रसिद्ध प्रार्थना सदाचार संकल्प संकल्पना दे डॉ ए.के. शेख लिखित डॉ राजेश उमाळे यांनी संगीतबद्ध केलेली व गायलेली आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची सबके लिए खुला है मंदिर ये हमारा है भजन विद्यार्थ्यांना शिकविले

या कार्यक्रमाकरिता सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी श्री राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नंदकिशोर गोपकर, डॉ. अनिल सोमवंशी तसेच प्राध्यापिका डॉ पुष्पा दहिकर प्रामुख्याने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री गायकवाड या विद्यार्थिनीने तसेच प्रास्ताविक कु. कोमल आगलावे व आभार प्रदर्शन ओम अतकरे या विद्यार्थ्यांने केले.



प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ही केंद्र सरकारची एक महत्त्वाची योजना आहे, जी गरीब कुटुंबांना मोफत गॅस कनेक्शन उपलब्ध करून देते. या योजनेचा उद्देश स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक इंधनांमुळे (जसे की लाकूड, गोवरी, कोळसा) होणारे आरोग्यदुष्टीने अपायकारक धूर आणि प्रदूषण कमी करणे हा आहे. यादृष्टीने विद्यार्थ्यानी गावात घरोघरी जाऊन जनजागृती केली व महिलाना या दृष्टीने प्रेरित करण्याचे काम केले .




धश्रद्धा, समाज, देशभक्ती, स्त्रीभ्रूण हत्या, हागणदारी मुक्त गाव, प्रेम, माय-बाप, स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियानसंबंधी युवकांचा जागर या विषयांवर अंतर्मुख करणाऱ्या कवितांनी रंगलेले कविसंमेलन गावकऱ्यांचे तथा शिबिरार्थींच्या मनोरंजनासह जागृती करून गेले. हे कविसंमेलन दत्तक ग्राम तोंगलाबाद येथे जे. डी. पाटील सांगळूदकर

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत नुकतेच आयोजित केले होते. अनेक प्रसिद्ध कवींनी एकापेक्षा एक बहारदार कविता सादर केल्यात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय विल्हेकर होते. दर्यापूर तालुक्यातील कवी पुरुषोत्तम गावंडे, राजेंद्र भटकर, मुरलीधर नाईक, सुनील ठाकूर, दिनकर ठाकरे, सुधीर हेमणे, गणेश तायडे, गणेश साखरे, रणजित गणोदे, तुषार कडू तसेच वणी, मूर्तिजापूर,हिरपूर, खामगाव येथील कवींचा या संमेलनात सहभाग होता. रुणाईला अंतर्मुख होऊन आयुष्याचा वेध घ्यायला लावणाऱ्या, तर कधी समाजातील अनिष्ठ प्रथा, व्यसनाधीनतेवर प्रहार करणाऱ्या कवितांनी सर्वांना अंतर्मुख केले. या प्रसंगी शिबिरार्थी, गावकरी मोठ्या व संख्येने उपस्थित होते. रासेयो समिती अध्यक्ष प्राचार्य केशवरावजी गावंडे, प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांचे मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. वैशाली चौरपगार, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुशील चरपे, प्रा. डॉ. प्रीती दिवाण यांनी यांनी या कविसंमेलनाचे आयोजन केले होते. तोगलाबादच्या सरपंच वैशाली पानझाडे, रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी, कवयित्री व शिबिरार्थींचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

अमरावती सिटी 05-03-2025

दैनिक भास्कर समूहाचे वृत्तपत्र
**दिव्य मराठी**

# अंधश्रद्धा, देशभक्ती, स्त्रीभ्रूण हत्या, प्रेम, माय-बापवर रंगले कविसंमेलन

## सांगळूदकर महाविद्यालयाचे तोंगलाबाद येथे रासेयो शिबिर



रासेयो शिबिरात कविता सादर करताना डॉ. रणजित गणोदे व उपस्थित अन्य कवी.

**प्रतिनिधी** | दर्यापूर

अंधश्रद्धा, समाज, देशभक्ती, स्त्रीभ्रूण हत्या, हागणदारी मुक्त गाव, प्रेम, माय-बाप, स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियानसंबंधी युवकांचा जागर या विषयांवर अंतर्मुख करणाऱ्या कवितांनी रंगलेले कविसंमेलन गावकऱ्यांचे तथा शिबिरार्थींच्या मनोरंजनासह जागृती करून गेले. हे कविसंमेलन दत्तक ग्राम तोंगलाबाद येथे जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत नुकतेच आयोजित केले होते. अनेक प्रसिद्ध कवींनी एकापेक्षा एक बहारदार कविता सादर केल्यात.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विजय विल्हेकर होते. दर्यापूर तालुक्यातील कवी पुरुषोत्तम गावंडे, राजेंद्र भटकर, मुरलीधर नाईक, सुनील ठाकूर, दिनकर ठाकरे, सुधीर हेमणे, गणेश तायडे, गणेश साखरे, रणजित गणोदे, तुषार कडू तसेच वणी, मूर्तिजापूर, हिरपूर, खामगाव येथील कवींचा या संमेलनात सहभाग होता.

प्रा. डॉ. रणजित गणोदे यांच्या बहारदार संचालनाने कविसंमेलनात अधिकच रंग भरला गेला. तरुणाईला अंतर्मुख होऊन आयुष्याचा वेध घ्यायला लावणाऱ्या, तर कधी समाजातील अनिष्ठ प्रथा, व्यसनाधीनतेवर प्रहार करणाऱ्या कवितांनी सर्वांना अंतर्मुख केले. या प्रसंगी शिबिरार्थी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रासेयो समिती अध्यक्ष प्राचार्य केशव गावंडे, प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांचे मार्गदर्शनात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. वैशाली चौरपगार, सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुशील चरपे, प्रा. डॉ. प्रीती दिवाण यांनी यांनी या कविसंमेलनाचे आयोजन केले होते. तोगलाबादच्या सरपंच वैशाली पानझाडे, रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी, कवयित्री व शिबिरार्थींचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

**२५ /०२/२०२५**

सकाळ च्या सत्रात योगासने व व्यायाम नंतर प्रभातफेरी काढण्यात आली व त्यानंतर २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या सत्रात एकूण लागवड केलेल्या ८५०० वृक्षाच्या जागी जाऊन वृक्षसंवर्धन प्रकल्पच्या दृष्टीने स्वयंसेवकाकडून श्रमदान करण्यात आले




***मा. श्री सौरभ कटियार** , जिल्हाधिकारी अमरावती यांनी राष्ट्रीय सेवा योजना च्या प्रकल्पाला भेट दिली त्यांना माहिती देताना प्रा. राहुल सावरकर , कार्यक्रम अधिकारी*

आजचा काळ ही तंत्रज्ञानाने प्रभावीत असलेला काळ आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाना उपयोग मोठया प्रमाणात होतो आहे. प्रत्येकाच्या हातामध्ये तंत्रज्ञान पोहोचले आहे. मोबाईलच्या रूपात आलेल्या तंत्रज्ञानाचा या युवा पिढीने योग्य पद्धतीने उपयोग केला तर ज्ञानाने समृद्ध करू शकते. मात्र जर दुरुपयोग केला तर आयुष्य उद्ध्वस्त सुद्धा

होवू शकते. अशा सकारात्मक आणि दुष्परिणाम देणाऱ्या दोन्ही गोष्टी या तंत्रज्ञाना सोबत आयुष्यात आलेल्या अहेत. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विस्कटलेली युवा पिढी सुद्धा आपण पाहतो , परंतु त्याच तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आयुष्या घडवणारी सुद्धा पिढी आपण पाहतो. म्हणजेच आपल्या सदसद्विविवेक बुद्धीने जर योग्य वापर केला तर तंत्रज्ञान हे तुम्हाला यशाच्या शिखरावर सुद्धा नेऊ शकते हे अनेक उदाहरण देऊन त्यांनी पटवून दिले तंत्रज्ञान जबाबदारीने वापरण्याने ज्ञान आमि उपयुक्त कौशल्य आत्मसात करावे व जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन प्रा. डॉ. नरेंद्र माने, सदस्य, रासेयो सल्लागार समिती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले. बौद्धिक सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डिजिटल साक्षरता व युवा पिढी या विषयावर बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या व्यासपीठाचा युवकांनी फायदा घेऊन त्यात समरस होण्याचे आवाहन केले. हे सत्र यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. राजेश बुरंगे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.राजेश उमाळे डॉ. विजय एलकर व्यासपीठावर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. राजेश बुरगे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजनेवा फायदा घेण्याच्या आवाहन केले. प्राचार्य डॉ अतुल बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित शिबिरातील या कार्यक्रमाचे संचालन कु समीक्षा देशमुख हिने तर प्रास्ताविक कु. पलक खंडारे या विद्यार्थिनींनी केले. आभार कु. प्रणाली वानखडे हीने मानले. या प्रसंगी सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, डॉ. वैशाली चौरपगार, डॉ. सुशील चरपे , डॉ. प्रीती दिवाण तसेन प्रा. डॉ. नेत्रा तेल्हारकर,डॉ. तुषार वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.











१०७ – राष्ट्रीय सेवा योजना , जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय दर्यापूर.

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
॥ श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ॥
आता रोज रहा अपडेट!
अध्ययन समाचार
संपादक : जितेंद्र रोडे
सुविचार
मनाची शांती सर्वात मोठं धन आहे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 | दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com | Adhayayn Samachar
शनिवार दि. १ मार्च २०२५

# डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे-डॉ.नरेंद्र माने

**अध्ययन समाचार वृत्तसेवा**

**दर्यापूर दि.१ प्रतिनिधी**

आजचा काळ हा तंत्रज्ञानाने प्रभावीत असलेला काळ आहे. सर्वच क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो आहे. प्रत्येकाच्या हातामध्ये तंत्रज्ञान पोहोचले आहे. मोबाईलच्या रूपात आलेल्या तंत्रज्ञानाचा या युवा पिढीने योग्य पद्धतीने उपयोग केला तर ज्ञानाने समृद्ध करू शकते. मात्र जर दुरूपयोग केला तर आयुष्य उध्वस्त सुद्धा होवू शकते. अशा सकारात्मक आणि दुष्परिणाम देणाऱ्या दोन्ही गोष्टी या तंत्रज्ञानासोबत आयुष्यात आलेल्या आहेत. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बिघडलेली युवा पिढी सुद्धा आपण पाहतो, परंतु त्याच तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आयुष्य घडवणारी सुद्धा पिढी आपण पाहतो. म्हणजेच आपल्या सदसदविवेकबुद्धीने जर योग्य वापर केला तर तंत्रज्ञान हे तुम्हाला यशाच्या शिखरावर सुद्धा नेऊ शकते हे अनेक उदाहरण देऊन त्यांनी पटवून दिले. तंत्रज्ञान जबाबदारीने वापरण्याचे ज्ञान आणि उपयुक्त कौशल्य आत्मसात करावे व जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन प्रा.डॉ.नरेंद्र माने, सदस्य, रासेयो सल्लागार समिती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले. ते जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालया तर्फे टोंगलाबाद येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या बौद्धिक सत्रामध्ये प्रमख वक्ते म्हणून डिजिटल साक्षरता व युवा पिढी या विषयावर बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या व्यासपीठाचा युवकांनी फायदा घेऊन त्यात समरस होण्याचे आवाहन केले. हे सत्र यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. राजेश बुरंगे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.राजेश उमाळे, डॉ. विजय येलकर व्यासपीठावर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ.राजेश बुरंगे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना समायोचीत मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजनेचा फायदा घेण्याच्या आवाहन केले.प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित शिबिरातील या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. समीक्षा देशमुख हिने तर प्रास्ताविक कु. पलक खंडारे ह्या विद्यार्थिनींनी केले. आभार कु. प्रणाली वानखडे हीने मानले. या प्रसंगी सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार, डॉ. सुशील चरपे, डॉ. प्रीती दिवाण तसेच प्रा. डॉ. नेत्रा तेल्हारकर, प्र.डॉ.तुषार वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते.




## राष्ट्रीय सेवा योजनेतून केले जातात युवा पिढीवर संस्कार

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) ही भारत सरकारद्वारे सुरू करण्यात आलेली एक स्वस्त आणि सर्वसामान्यांसाठी उपयुक्त जीवन विमा योजना आहे. या योजनेंतर्गत कमी उत्पन्न गटातील आणि असंघटित क्षेत्रातील नागरिकांना कमी प्रीमियममध्ये जीवन विमा सुरक्षा मिळते. या योजनेअंतर्गत लाभार्थ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबाला ₹२ लाखांचा विमा कवच मिळतो, त्यामुळे आर्थिक स्थैर्य राखता येते. ही योजना केवळ ₹४३६/- वार्षिक प्रीमियममध्ये उपलब्ध आहे, जी कोणत्याही सामान्य व्यक्तीला परवडणारी आहे. मोफत किंवा कमी किमतीत विमा घेतल्याने गरीब कुटुंबांना आर्थिक

मदतीचा आधार मिळतो, विशेषतः कुटुंबप्रमुखाच्या मृत्यूनंतर. अजूनही अनेक लोक विम्याबद्दल अनभिज्ञ आहेत किंवा त्याला दुय्यम स्थान देतात. या योजनेची माहिति गावागावांत, शाळा, पंचायत कार्यालये आणि बँक शाखांद्वारे पोहोचवली जाते. मोफत शिबिरे, बॅनर, रेडिओ आणि सोशल मीडियाचा वापर करून योजनेची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही सामान्य नागरिकांसाठी अत्यंत फायदेशीर आहे. अधिकाधिक लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, म्हणून जनजागृती मोहीम अत्यावश्यक आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक व्यक्तीने आर्थिक सुरक्षिततेसाठी ₹२ लाख विमा संरक्षण घ्यावे आणि आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करावे. अशी जनजागृती राष्ट्रीय सेवा योजना च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, डॉ. वैशाली चौरपगार, डॉ. सुशील चरपे , डॉ. प्रीती दिवाण यांच्या मार्गदर्शनात केली .






लहान मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे हे त्यांना भारतीय संस्कृतीशी जोडण्याचा उत्तम मार्ग आहे. अशा कार्यक्रमांमधून त्यांना नवीन कला शिकता येतात, आत्मविश्वास वाढतो आणि सर्जनशीलता विकसित होते. याच निमित्ताने संध्याकाळ च्या सांस्कृतिक कार्यक्रमात जि. प. शाळा तोंगलाबाद व राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद येथील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले व त्यांना सर्वांना उत्तेजनार्थ डॉ. वैशाली चोरपगार महिला कार्यक्रम अधिकारी यांनी राष्ट्रीय सेवा योजना तर्फे देण्यात आले.

**२६/०२/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तर्फे ग्रंथ दिंडी हा एक प्रेरणादायी उपक्रम आहे, जो वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी राबवला जातो. हा उपक्रम प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थी, स्वयंसेवक आणि शिक्षक यांच्या सहभागाने साजरा केला जातो.

ग्रंथ दिंडी म्हणजे पुस्तकांची मिरवणूक! यात सहभागी विद्यार्थी आणि स्वयंसेवकांनी हातात पुस्तक घेऊन घोषवाक्ये देत, वाचनाची गोडी वाढवण्याचे संदेश देत परिसरात फेरी काढली . याचे मुख्य उद्दिष्टे वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे, समाजात ग्रंथप्रेम वाढवणे, नवीन पिढीला पुस्तकांचे महत्त्व पटवून देणे., सोशल मीडियाच्या आहारी न जाता वाचनाची आवड निर्माण करणे.

ग्रंथदिंडी दरम्यान विद्यार्थी आणि शिक्षक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेत संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व संत गाडगेबाबा , डॉ. पंजाबराव देशमुख , संत तुकडोजी महाराज यांचे विचार सांगणारे फलक आणि घोषवाक्ये मिरवणुकीत लावण्यात आले होते वाचनविषयक गीते, अभंग किंवा घोषवाक्ये दिली सामाजिक विषयांवर पथनाट्य केले .

आजच्या डिजिटल युगात पुस्तके वाचण्याची सवय कमी होत चालली आहे. ग्रंथ दिंडीसारख्या उपक्रमामुळे लोकांना वाचनाची आठवण करून देता येते. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त वाचनाची गोडी लावतो आणि समाजात एक सकारात्मक संदेश पसरवतो.

ग्रंथ दिंडीसारखे उपक्रम समाजाला ग्रंथसंस्कृतीची जाणीव करून देतात आणि नव्या पिढीला पुस्तकांकडे वळवतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून हा उपक्रम

अधिकाधिक ठिकाणी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. सदर ग्रंथदिंडी कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर, डॉ. वैशाली चौरपगार, डॉ. सुशील चरपे , डॉ. प्रीती दिवाण यांच्या मार्गदर्शनात पार पडली यात गावकऱ्यानी विशेष सहभाग नोंदविला .




**राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तर्फे रोगनिदान शिबिर** हा समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आयोजित केला जाणारा उपक्रम आहे. NSS स्वयंसेवक आणि वैद्यकीय तज्ज्ञांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित केले गेले , जेणेकरून ग्रामीण भागातील तसेच गरजू नागरिकांना मोफत वैद्यकीय सेवा मिळू शकतील.

२६ फेब्रुवारी २०२५ ला रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिराकरिता दर्यापूर येथील सुप्रसिद्ध डॉ. ओमप्रकाश जळमकर, हृदयरोग व मधुमेह तज्ञ , डॉ. धनश्री जळमकर (तायडे), नेत्र विकार व फेको सर्जरी तज्ञ तसेच डॉ. मनीष हुतके, बालरोग तज्ञ उपस्थित होते. या शिबिरादरम्यान डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना योग्य असे मार्गदर्शन केले. या शिबिराचा गावातील सुमारे १५० रुग्णांनी लाभ घेतला. सदर

कार्यक्रमाकरिता सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक व स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी श्री राहुल सावरकर, प्रा. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. संतोष उके, प्रा. निलेश किसवे प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) माध्यमातून रोगनिदान शिबिरे आयोजित केल्याने समाजाच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण होतात आणि आरोग्य जाणीवसंपन्नता वाढते. असे शिबिरे नियमितपणे घेण्यात यावी, जेणेकरून प्रत्येक नागरिक निरोगी राहू शकेल. असे मत गावकाऱ्यानी व्यक्त केले .






प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) ही केंद्र सरकारची एक महत्त्वाकांक्षी योजना आहे, जी २०१५ साली सुरू करण्यात आली. या योजनेचा उद्देश २०२४ पर्यंत "सर्वांसाठी घरे" (Housing for All) हे लक्ष्य पूर्ण करणे आहे. ह्या योजनचे जनजागृती घरोघरी जाऊन केली त्यासाठी गावकऱ्यांचे विशेष असे सहकार्य लाभले .




प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण टप्पा-२
सन २०२४-२५ वर्षातील मंजूर लाभार्थ्यांची यादी
ग्रामपंचायत - तोंगलाबाद तालुका - दर्यापूर जिल्हा - अमरावती
अ.क्र. लाभार्थ्यांचे नाव लाभार्थ्यांचा आवास ID
1 अर्जुन मारोती मेहरे MH122820556
2 निलेश काशीराम काळदाते MH122821156
3 रुपाली दिपक धारपवार MH123587661
4 देविदास पुजांजी विरकड MH123591415
5 सुनील प्रल्हाद मानकर MH123922102
6 शंकर महादेव चवरे MH123939278
7 विश्वनाथ नारायण मेहरे MH123954012
8 नारायण राजाराम जऊळकार MH123958402
9 रामकृष्ण भगवान पवित्रकार MH123970197
10 पुंडलिक मोतीराम काळे MH123994288
11 दिनकर किसन गणोदे MH124078419
12 सविता दिलीप काळदाते MH124080969
13 गणेश तुळशीराम काळदाते MH124081532
14 रघुनाथ नामदेव बायस्कार MH124173185
15 दिवाकर मधुकर जळमकर MH124980149
16 वासुदेव जगदेव काळदाते MH125047970
17 मोतीराम वाघमारे MH125183068
18 जगदेव काळदाते MH125188488
19 शंकर मनोहर काळे MH125193189
20 MH125197346
21 अरुण श्रीहरी राऊत MH125222000
22 रमेश पूर्णाजी तायडे MH131273144
23 संतोष मोतीराम वसतकर MH131275389
24 उमेश सदाशिव जऊळकार MH136093202
25 प्रकाश बळीराम जऊळकार MH136098057
26 रमेश रामभाऊ महानकर MH136532905
27 श्रीकृष्ण रामकृष्ण काळे MH136533305
28 सुभाष श्रीराम शर्मा MH136533432
29 दिलीप लक्ष्मण कावनपुरे MH136533694
30 अरुण देविदास काळदाते MH136533776
31 केशव नामदेव जऊळकार MH136533986
32 प्रशांत वासुदेव काळे MH136673185
33 संजय माणिक जळमकर MH136673247
34
35
36
37
38

**२७/०२/२०२५**

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) तर्फे महिलांसाठी खेळ व स्पर्धा हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे, जो महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी तसेच आत्मविश्वास वाढवण्यासाठी राबवला जातो. NSS च्या माध्यमातून विविध खेळांचे आयोजन करून महिलांना उत्स्फूर्त सहभागासाठी प्रेरित केले गेले. या सत्रा मागील उद्दिष्टे महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी, महिलांमध्ये आत्मविश्वास व नेतृत्वगुण वाढवण्यासाठी, सामाजिक एकोपा आणि संघभावना निर्माण करण्यासाठी, व्यायाम आणि फिटनेसबाबत जागरूकता वाढवण्यासाठी, महिलांच्या सशक्तीकरणाला चालना देण्यासाठी. शारीरिक आरोग्य सुधारते आणि तंदुरुस्ती वाढते. तणावमुक्त जीवनशैलीस मदत होते. समूहातील कार्यक्षमता वाढते आणि संघभावना विकसित होते,महिलांच्या सशक्तीकरणाला चालना मिळते, नवीन कौशल्ये शिकण्याची संधी मिळते.या प्रकारचे होत

NSS तर्फे महिलांसाठी खेळांचे आयोजन केल्याने त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास चालना मिळते, संघभावना निर्माण होते आणि महिलांचे सबलीकरण होते. अशा उपक्रमांना अधिकाधिक प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.असे मत गावातील महिलांनी केले

रक्तगट तपासणी शिबिर आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांचे सामाजिक व आरोग्यदायी दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा रक्तगट माहीत असणे आवश्यक आहे, विशेषतः आपत्कालीन परिस्थितीत.रक्तगट तपासल्याने लोकांना रक्तदानासाठी प्रेरणा मिळते आणि ते गरजूंसाठी रक्तदान करू शकतात.अपघात, शस्त्रक्रिया,

किंवा गंभीर आजारांमध्ये रक्तगट माहिती असणे महत्त्वाचे ठरते.या उपक्रमामुळे समाजात एकमेकांची मदत करण्याची वृत्ती वाढते. NSS अंतर्गत अशा शिबिरांचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची वृत्ती निर्माण होते. NSS स्वयंसेवक अशा शिबिरांमध्ये सहभाग घेतल्याने गावात आणि शहरी भागात आरोग्याविषयी जागरूकता वाढत रक्तगट तपासणीमुळे NSS च्या माध्यमातून रक्तदान मोहिमा यशस्वी होतात.नैसर्गिक आपत्ती, अपघात, किंवा गंभीर परिस्थितीत NSS स्वयंसेवक रक्तदान आणि मदतकार्य सहजतेने करू शकतात. या उपक्रमामुळे युवकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होते.रक्तगट तपासणी शिबिर हे केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित नाही, तर ते सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे. राष्ट्रीय सेवा योजना अशा शिबिरांच्या माध्यमातून समाजात आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करत एक सकारात्मक बदल घडवते. याच अनुषंगाने विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये शालेय विद्यार्थ्यांचा व गावकऱ्यांसाठी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तगट तपासणी शिबिर आयोजित केले होते यात १५० लाभार्थींनि सहभाग नोंदविला




सिकल सेल ॲनेमिया हा आनुवंशिक रक्तविकार असून तो प्रामुख्याने विशिष्ट समुदायांमध्ये आढळतो. ग्रामीण व आदिवासी भागात या रोगाचे प्रमाण जास्त असल्याने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत सिकल सेल ॲनेमिया तपासणी व जनजागृती शिबिरांचे आयोजन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**सिकल सेल ॲनेमिया तपासणी शिबिराचे उद्देश:**

1. **रोगाचे लवकर निदान करणे:** सिकल सेल आजार व वाहक (Carrier) असलेल्या व्यक्तींची ओळख पटवणे.
2. **रोगाविषयी जागरूकता वाढवणे:** स्थानिक लोकांना या आजाराची लक्षणे, परिणाम आणि प्रतिबंधात्मक उपाय सांगणे.
3. **आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे:** निदान झालेल्या रुग्णांना योग्य वैद्यकीय सल्ला आणि उपचार मिळवून देणे.
4. **युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे:** NSS स्वयंसेवकांना आरोग्यसेवेचे महत्त्व पटवून देणे व त्यांना समाजसेवेसाठी प्रेरित करणे.
5. **जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाय:** सिकल सेल ॲनेमिया आनुवंशिक असल्यामुळे विवाहपूर्व तपासणी व जनजागृती करून भविष्यातील रुग्णसंख्या कमी करणे.

राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत सिकल सेल ॲनेमिया तपासणी आणि जनजागृती शिबिरांचे आयोजन केल्याने समाजात या आजाराविषयी महत्त्वपूर्ण जागरूकता निर्माण

होते. यामुळे वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय शक्य होतात. NSS च्या माध्यमातून युवकांना समाजाच्या आरोग्यविषयक गरजांची जाणीव होत असून त्यांना जबाबदार नागरिक बनवले जाते. हे शिबिर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग , ग्रामीण रुग्णालय व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते यात प्रा. हिमांशु जयसवाल , प्रा. हर्षदा कराळे , प्रा . अमर देशमुख , श्री सुबोध फुटाने , व इतर मान्यवरांचे विशेष सहकार्य लाभले.




मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून आपली संस्कृती, परंपरा आणि अस्मितेचे प्रतीक आहे. मराठी भाषा गौरव दिन हा दिवस आपल्याला आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगण्याची आणि तिच्या जतनासाठी योगदान देण्याची प्रेरणा देतो.याचाच एक भाग म्हणून दिनांक २७ फेब्रुवारी ला मराठी भाषा गौरव दिन आयोजित करण्यात आला होता

राज्य मराठी विकास संस्था महाराष्ट्र शासन या अंतर्गत स्थापन "संकल्प मराठी भाषा युवक मंडळ दर्यापूर यांचे तर्फे मराठी भाषा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. "कविवर्य कुसुमाग्रज" यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येतो स्थानिक ग्रामपंचायत तोंगलाबाद येथे राष्ट्रीय सेवा योजना जे. डी पाटिल सांगळूदकर महाविद्यालय यांच्या शिबिरा मधील विद्यार्थ्यांसाठी आणि उपस्थित प्राध्यापकांसाठी मराठी भाषा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून 'श्री शेषरावजी काळे 'आज जीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती लाभले होते प्रमुख अतिथी म्हणून प्रा. श्री राहुल सावरकर होते. मराठी भाषा संवर्धन प्रचार व प्रसार याबद्दल डॉ. प्रसाद बावनेर यांनी विस्तृत मार्गदर्शन केले सदर कार्यशाळेमध्ये सुवाच्च अक्षरलेखन, भाषांतर स्पर्धा, वाचन आणि मराठी भाषेतील रोजगाराच्या संधी इत्यादी उपक्रम राबविण्यात आले

उपरोक्त स्पर्धेमध्ये एकूण 70 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यापैकी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या अनुराधा गावंडे, ओम ओलोकार, गौरी बावणे यांचा गुणगौरव टोंगलाबादच्या सरपंच सौ वैशाली निरंजन पानझडे यांच्यातर्फे करण्यात आला. तसेच शिक्षक गटातून स्पर्धेमध्ये डॉ. सुशील चरपे व डॉ प्रीती दिवाण आणि प्रा मंगला पांडे यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केला बक्षीस प्राप्त सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांना मान्यवरांचे हस्ते गोल्ड मेडल, सिल्वर मेडल आणि मराठी भाषेतील पुस्तके देऊन गौरविण्यात आले मराठी वाचन संस्कृती रुजावी आणि ती बळकट व्हावी या हेतूने प्रेरित होऊन उपस्थित सर्व शिक्षकांना आणि प्रोत्साहन पर पारितोषिक प्राप्त करणाऱ्या

विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील पुस्तके देण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या नियोजनासाठी डॉ रुपेश काळे, डॉ निवृत्ती बागलकर, श्री सागर साखरकर श्री अमित आगलावे, परवेज खान, रोशन भांगे आकाश साखरकर यांनी खूप मोलाचे सहकार्य केले राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा श्री राहुल सावरकर सर आणि डॉ हिमांशू जयस्वाल सर यांचे विशेष सहकार्य लाभले.





**२८/०२/२०२५**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. अतुल के बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेले आहे. या शिबिराचे समारोपीय कार्यक्रम दिनांक २८ फेब्रुवारी ला घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतूल केशवराव बोडखे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शीतलबाबू तायडे, रामकृष्ण महाविद्यालय दारापुर हे होते व प्रमुख उपस्थितीत सौ. वैशाली निरंजनराव पाणझाडे, सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद, श्री सुभाषराव जऊळकार, उपसरपंच, ग्रामपंचायत तोंगलाबाद, श्री रामहरी भाऊ राऊत माजी सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद , वर्षाताई काळपांडे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद, श्री गोपाल जऊळकार, संचालक स्व. ल. पा. जऊळकार वाचनालय तोंगलाबाद व प्रा. मनीष होले, आय क्यू ए सी समन्वयक हे होते .

डॉ शीतल तायडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले आणि त्यांना समाजहितासाठी कार्यरत राहण्याचे आवाहन केले.

सौ वैशाली निरंजनराव पानझाडे सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.

सर्व उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी शुभेछया दिल्यात

डॉ. अतूल केशवराव बोडखे यांनी त्यांच्या मनोगतातून रा.से.यो. हे तरुणांसाठी समाजसेवा व व्यक्तिमत्त्व विकासाची एक उत्तम संधी आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते आणि त्यांना जबाबदार नागरिक बनवले जाते असे प्रतिपादित केले.

कू. श्रेया गायगोले, चि. ओम अतकरे, चि. ओम ओलोकार, चि. रोहीत गावंडे, कू. प्रतिक्षा मांडोकर यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिर बद्दल आपले अभिप्राय दिले.

प्रसंगी राज्यस्तरीय उत्कर्ष शिबिरास अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल कू. कांचन संदेश वानखडे, राज्यस्तरीय आव्हान शिबिरात अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल चि. ओम विठ्ठलराव अतकरे व कू. साक्षी अनिलराव नितनवरे यांचे अभिनंदन करण्यात आले . विशेष श्रमसंस्कार शिबिराची भूमिका प्रास्ताविक स्वरूपात प्रा. राहूल सावरकर कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी केली तर सूत्रसंचालन कु. विधी पाथरे हिने केले व आभारप्रदर्शन कू. अदिती वानखडे हिने केले







या प्रसंगी कार्यक्रमात गावातील नागरिक, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच डॉ. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी, व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर गावकऱ्यांशी चर्चा करून निरोप घेण्यात आला व महाविद्यालयकडे विद्यार्थ्यांचे प्रस्थान झाले .

आपल्या शहरातील प्रत्येक बातमी
SOCIAL MEDIA EDITION
|| श्रीकृष्णम् वंदे जगतगुरुम् ||
आता रोज रहा अपडेट!
अध्ययन समाचार
संपादक : जितेंद्र रोडे
सुविचार
मनाची शांती सर्वांत मोठं धन आहे
कार्यालय : ब्राम्हणसभा कॉलनी, डॉ. गजभे यांच्या दवाखान्या समोर, लाकुड बाजार, परतवाडा. जि. अमरावती 444 805
भ्रमणध्वनी : 9422158005 दुरध्वनी : 07223-222005
jitendrarode77@gmail.com
Adhayayn Samachar
शनिवार दि. १ मार्च २०२५

## राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांवर संस्कार करणारी शाळा- डॉ. शीतल तायडे

**अध्ययन समाचार वृत्तसेवा**

दर्यापूर दि.१ प्रतिनिधी

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर २१ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल के. बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेले आहे. या शिबिराचे समारोपीय कार्यक्रम २८ फेब्रुवारी ला घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतूल केशवराव बोडखे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शीतल तायडे, रामकृष्ण महाविद्यालय दारापुर हे होते व प्रमुख उपस्थितीत सौ. वैशाली निरंजनराव पाणझाडे, सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद, सुभाषराव जऊळकार, उपसरपंच, ग्रामपंचायत तोंगलाबाद, रामहरी राऊत माजी



सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद , वर्षाताई काळपांडे मुख्याध्यापक तथा प्राचार्य राष्ट्रीय विद्यालय तोंगलाबाद, गोपाल जऊळकार, संचालक स्व. ल. पा.जऊळकार वाचनालय तोंगलाबाद व प्रा. मनीष होले, आय क्यू ए सी समन्वयक हे होते.

डॉ शीतल तायडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले आणि त्यांना समाजहितासाठी कार्यरत राहण्याचे आवाहन केले. सौ वैशाली निरंजनराव पानझाडे सरपंच ग्रामपंचायत तोंगलाबाद यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.

सर्व उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्यात. डॉ. अतूल केशवराव बोडखे यांनी त्यांच्या मनोगतातून रा.से.यो. हे तरुणांसाठी समाजसेवा व व्यक्तिमत्त्व विकासाची एक उत्तम संधी आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते आणि त्यांना जबाबदार नागरिक बनवले जाते असे प्रतिपादित केले. कू. श्रेया गायगोले, चि. ओम अतकरे, चि. ओम ओलोकार, चि. रोहीत गावंडे, कू. प्रतिक्षा मांडोकर यांनी विशेष श्रमसंस्कार शिबिर बद्दल आपले अभिप्राय दिले.

प्रसंगी राज्यस्तरीय उत्कर्ष शिबिरास अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल कू. कांचन संदेश वानखडे, राज्यस्तरीय आव्हान शिबिरात अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल चि. ओम विठ्ठलराव अतकरे व कू. साक्षी अनिलराव नितनवरे यांचे अभिनंदन करण्यात आले . विशेष श्रमसंस्कार शिबिराची भूमिका प्रास्ताविक स्वरूपात प्रा. राहूल सावरकर कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी केली तर सूत्रसंचालन कु. विधी पाथरे हिने केले व आभारप्रदर्शन कू. अदिती वानखडे हिने केले

या प्रसंगी कार्यक्रमात गावातील नागरिक, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच डॉ. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी, व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्य मराठी
अमरावती सिटी 11-03-2025

**समारोप** • प्रा. डॉ. शीतल तायडे यांचे प्रतिपादन, सांगळूदकर महाविद्यालयाचे रासेयो शिबिर

# राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांवर संस्कार करणारी शाळा : प्रा. डॉ. तायडे


रासेयो शिबिराच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना शीतल तायडे व मंचावर उपस्थित मान्यवर.


रासेयो शिबिर समारोपप्रसंगी विजय चौधरी यांचा सत्कार करताना मान्यवर.

प्रतिनिधी | दर्यापूर

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे महाविद्यालयीन दशेत विद्यार्थ्यांवर संस्कार करणारी एक शाळाच आहे , असे प्रतिपादन दारापूर येथील रामकृष्ण महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शीतल बाबू तायडे यांनी केले. जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रम संस्कार शिबिर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंगलाबाद येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केले होते. या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते मार्गदर्शन करत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अतुल बोडखे होते. या प्रसंगी तोंगलाबादच्या सरपंच वैशाली पानझाडे, उपसरपंच सुभाषराव जऊळकार, माजी सरपंच रामहरी राऊत, राष्ट्रीय विद्यालयाच्या प्राचार्य वर्षा काळपांडे, जऊळकार वाचनालयाचे संचालक गोपाल जऊळकार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. मनीष होले उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी अंगी सेवाभावी वृत्ती जोपासावी. आपणही समाजाचे काही देणे लागतो, या भावनेतून समाजहितासाठी सतत कार्यरत राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. शीतल बाबू तायडे यांनी विद्यार्थ्यांना केले. सरपंच वैशाली पानझाडे यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला. तसेच सर्व उपस्थित मान्यवरांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी राज्यस्तरीय उत्कर्ष शिबिरात अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल कांचन वानखडे, राज्यस्तरीय आव्हान शिबिरात अमरावती जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केल्याबद्दल ओम अतकरे व साक्षी नितनवरे यांचे अभिनंदन करण्यात आले. रासेयो शिबिरार्थी श्रेया गायगोले, ओम अतकरे, ओम ओलेकार, रोहित गावंडे, प्रतीक्षा मांडोकर यांनी विशेष श्रम संस्कार शिबिराबद्दल आपले अभिप्राय दिले. या शिबिराची भूमिका प्रास्ताविक स्वरूपात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल सावरकर यांनी मांडली. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विधी पाथरे यांनी केले. आभार अदिती वानखडे यांनी मानले. या प्रसंगी गावातील नागरिक, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वैशाली चौरपगार, डॉ. सुशील चरपे, डॉ. प्रीती दिवाण व रासेयोचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रासेयो विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक बनवते : प्राचार्य बोडखे

प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी मनोगतातून रासेयो हे तरुणांसाठी समाजसेवा व व्यक्तिमत्त्व विकासाची एक उत्तम संधी आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते आणि त्यांना जबाबदार नागरिक बनवले जाते, असे प्रतिपादन केले.

## 'श्रमसंस्कार शिबिरांतून रासेयो तरुणांमध्ये जीवन मूल्ये रुजवते'

प्रतिनिधी | शेंदुरजनाघाट

आजच्या डिजिटल युगात तरुणावर संस्कार करणे हे काळाचे मोठे आव्हान आहे. तरुणांवर जीवन मूल्यांचे संस्कार श्रमसंस्कार शिबिरांतून होत आहेत. त्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना ही तरुण मनावर संस्कार करणारी कृती शाळा असल्याचे प्रतिपादन वरुड येथील जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. मनोहर आंडे यांनी केले. ते डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाचे झटामझिरी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या ७ दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. रासेयो श्रम संस्कार शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. प्रभाकर सावरकर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून वरुड येथील जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. मनोहर आंडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संस्थेचे संचालक अरुण फुटाणे, विजय चौधरी, सरपंच हिराकांत उइके, उपसरपंच राजेंद्र शिवणकर, मुख्याध्यापिका सुषमा बुरांडे, डॉ. अविनाश घोबे उपस्थित होते.

संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाधिकारी डॉ. तिलकचंद घोटे यांनी अहवाल वाचन करून श्रमसंस्कार शिबिरात राबवलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. रासेयो शिबिरार्थी संदेश डोंगरे, अंजली उइके व आदेश ढोक यांनी शिबिराच्या संदर्भातील आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या प्रसंगी विजय चौधरी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी बावणेने केले, तर आभार रासेयो महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. लुंबिनी गणवीर यांनी मानले. शिबिरासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. तिलकचंद घोटे, डॉ. प्रशांत चर्जन, हितेश बेले, रमेश उइके, शिबिर प्रमुख अंजली उइके, गटप्रमुख प्रिन्स धर्मे, महिला गटप्रमुख पूर्वा देरेकर व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

डिजिटल
अमरावती माझा
सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्काचं व्यासपीठ
(कार्यालय) मालवाडा, तालुका दर्यापूर / जिल्हा अमरावती महाराष्ट्र 444803
मुख्य संपादक –आदेश खांडेकर ९६६५२२७१०३
मंगळवार, 25 फेब्रुवारी, 2025 *अंक, :640 *पृष्ठ : 4*अवधिकता : दैनिक *भाषा : मराठी. *मूल्य : 3, रुपये. *वर्ष : 3,ले RNI : MAHMAR/2024/89646

# राष्ट्रीय सेवा योजना च्या विद्यार्थ्यांनी केले तोंगलाबाद येथे वृक्षसंवर्धन



दर्यापूर (तालुका प्रतिनिधी)संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ ,अमरावती संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था ,अमरावती द्वारा संचालित जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , तोंगलाबाद ता. दर्यापूर जि. अमरावती येथे महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. अतुल के बोडखे यांच्या मार्गदर्शनात आयोजित केलेले आहे. ह्या शिबिरात विद्यार्थ्यांनी वृक्ष संवर्धन व पाणी आडवा पाणी जिरवा हा प्रकल्प मोठ्या प्रमाणावर राबवण्यात आला. सत्र २०२३-२४ व सत्र २०२४ २५ मध्ये ग्रामपंचायत तोंगलाबाद व राष्ट्रीय सेवा योजना जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय दर्यापूर यांच्या संयुक्त विद्यमाने तोंगलाबाद च्या रान शिवारात अनुक्रमे ३००० व ५५०० वृक्षांची लागवड करण्यात आली त्याच अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थी नियमित गावात येऊन झाडांची निगा राखतात व शिबिरात आठ दिवस सुद्धा वृक्ष संवर्धनाचे काम मोठ्या प्रमाणात करतात त्यात वृक्षांची ओळख, झाडाला उखरी, पाणी टाकणं, इत्यादी कामे मोठ्या उत्साहात केली सदर प्रकल्पाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अतूल बोडखे, सौ.वैशाली निरंजनराव पानझाडे, कार्यक्रम अधिकारी श्री राहुल सावरकर, डॉ. वैशाली चौरपगार महीला कार्यक्रम अधिकारी, डॉ. सुशील चरपे सह-कार्यक्रम अधिकारी, डॉ प्रीती दिवाण महीला सह-कार्यक्रम अधिकारी, श्री सोपान जऊळकर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, व गावकरी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# *स्वच्छ भारत सुंदर भारत*